PM/13125 MR.RAMCHANDRA S. PADGAONKAR
PM/13341 MR.BHARAT MAHADEV JADHAV

**SOLAPUR**

PM/13244 MR.AMARNATH V. DARA
PM/13390 MR.SASHIKANT J. KHISTE
PM/13134 MR.SHIVRAJ VISHNUPANT KULKARNI
PM/13145 MRS.MADHURI JAGANNATH KULKARNI
PM/13391 MR.SATISH K. REGE
PM/13371 MR.SANJAY V. UPLAP
PM/13245 MRS.AMRITA M. GUJRAL
PM/13296 MR.MOTIRAM NIVRUTTTI KAMBLE
PM/13375 SHRI. PRADYMNA VITTHAL KAMBLE
PM/13372 MR.RAMDAS G. RANDIVE
PM/13373 MR.SHASHIKANT H. RANSHINGARE

**THANE**

PM/13403 MR.SAI KUMAR R. MENON
PM/13416 SMT.SHUBHANGI K. NIKALE
PM/13420 MR.SADANAND HARI APTE
PM/13417 MRS.NEELA V. DHARAP
PM/13269 MRS.SMITA SURESH JOSHI
PM/13306 MR.SUNEEL R.KOTWAL
PM/13265 MR.CHANDRASHEKHAR B. PUSALKAR
PM/13179 MRS.SUREKHA V. SHARMA
PM/13408 MRS.VIDDYS RAVINDRA SHINDE
PM/13160 MRS.ASHWINI K. TAWDE
PM/13317 MR.SHASHIKANT N. VAISHAMPAYAN
PM/13407 MRS.APARNA S. VAZE
PM/13397 MR.SURESH R. LATE
PM/13396 MR.MRUDULA A. TAMHANKAR
PM/13268 MRS.SWATI V. MARATHE
PM/13418 MRS.T.SUNDARI N. MURTHY
PM/13320 MR.VINAY M. SHINDE

PM/13419 MR.GOPICHAND H. SURANJE
PM/13308 MR.VIDHYADHAR R. SURVE
PM/13398 MR.DILIP THAKKAR
PM/13395 MR.SHIRISH R. GANDHI
PM/13415 MR.DEVIDAS N. MAHAJAN

**WARDHA**

PM/13359 MR.BHAGWANSINGH M. CHANDEL
PM/13360 MR.ANANT N. KAWARE
PM/13362 MR.MUKUND P. MENDEWAR
PM/13361 MR.VIMALKISHOR M. SHARIYA
PM/13363 MR.MAKARAND M. UMALKAR

**YAVATMAL**

PM/13323 MR.VAIJNATH D.NIKAM
PM/13216 MR.CHANDRASHEKHAR B.PANDE
PM/13217 MR.VINAYAK SHESHRAO PANDE

## Associate Members

**AHMEDNAGAR**

APM/11770 MRS.SUREKHA D.GADILKAR
APM/11769 MRS.HEMANGINI HEMANT DESHMUKH
APM/11644 MRS.PINGALA A. MUTAKE
APM/11638 MRS.HIRA L.SANGALE

**AKOLA**

APM/11756 MRS.SAVITA P. GOSAI
APM/11754 MR.SANAJY V. JAPE
APM/11753 MRS.SUJATA S. KADUSKAR
APM/11620 MRS.SHANTABAI V. BOHARI

**AMRAVATI**

APM/11651 MRS.MINAKSHI H. BHAISE
APM/11652 MRS.SUDHA CHAKRANARAYAN
APM/11661 MRS.REKHA JANARDAN DESHMUKH
APM/11648 MRS.ANJALI TRIMBAKRAO DESHPANDE
APM/11649 MRS.PRADNYA PRAMOD JOSHI
APM/11712 MRS.LALITA BHIMRAO KAMBLE
APM/11650 MRS.REKHA B. KARULE
APM/11752 MRS.DEVKA MAHADEO MORE
APM/11614 MRS.POOJA JAYANT PATIL
APM/11623 MRS.PUSHPA P. PUNDKAR
APM/11613 MRS.ARUNA V. SONAK
APM/11714 MRS.LATA R. RAVEKAR
APM/11714 MRS.LATA R. RAVEKAR

**AURANGABAD**

APM/11724 MRS.VATSALABAI K. KHAMBAT
APM/11736 MRS.JAYA V. LONIKAR
APM/11624 MRS.CHHAYA B. SONTAKKE

**BEED**

APM/11729 MRS.VIJAYA J. DASKHEDKAR

**BHANDARA**

APM/11607 MRS.INDU D. GAJBHIYE
APM/11609 MRS.VRUKSHALATA MESHRAM
APM/11608 MRS.MANORAMA MOTGHARE
APM/11611 MRS.JYOTI R. RAJABHOJ
APM/11612 MRS.KAMALABAI A. SURVE
APM/11606 MRS.VIJAYA U. WADEKAR
APM/11610 MRS.MUKTA D.BHAISARE

**BULDANA**

APM/11615 MRS.MEGHA S. DALAL
APM/11616 MRS.SUNANDA S. RAUT
APM/11755 MRS.PRAMILA N. BHIMEWAL
APM/11619 MRS.DEVKI B. CHAPARWAL
APM/11618 MRS.PUSHPA M. JESWANI
APM/11751 MRS.SHILPA KISHOR KULKARNI
APM/11617 MRS.VEENA Y. PATHAK
APM/11750 MRS.VIMAL B. SHINGNE

**DHULE**

APM/11740 MRS.SULBHA P. AHERKAR
APM/11629 MRS.HIRA D. MORE
APM/11630 MRS.ALKA J. THAKUR
APM/11741 MRS.VIDHYA S. BORDE

**DOMBIVALI**

APM/11657 MRS.SEEMA P. CHITNIS
APM/11660 MRS.JYOTI C. GUJAR
APM/11589 MR.SANJIV RAGHVENDRA JOSHI
APM/11705 MRS.SATISH R.KHANOLKAR
APM/11587 MRS.KARUNA M. NAGARE
APM/11655 MRS.JYOTI D. PURANIK
APM/11581 MR.S. SUBRAMANIAN
APM/11560 MRS.KAMAL M. THOMBRE
APM/11672 MRS.ANAGHA A. VAIDYA
APM/11673 MRS.VAIJAYANTHI VARDHARAJAN

**GOA**

APM/11636 MRS.AURORA DIAS HEDE
APM/11727 MR.ASOK S. KAMAT
APM/11728 MRS.VANDANA R.LINGUDKAR
APM/11716 MR.ROQUE J.MIRANDA
APM/11635 MRS.UMA U.SANZGIRI

**GONDIA**

APM/11604 MRS.SUREKHA M. AGRAWAL
APM/11596 MRS.SARASWATI H. CHHATWANI
APM/11599 MRS.VARSHA P. DHOMNE
APM/11605 MRS.ARCHANA D,. DUBEY
APM/11602 MRS.SHASHIKALA B. GOSAI
APM/11601 MRS.BHAGYAWATI RAHANGDALE
APM/11598 MRS.ANITA S. SHAHARE
APM/11600 MRS.MEENA G.THOKAL
APM/11603 MRS.RANJANA UMALKAR
APM/11597 MRS.VARSHA D. WADEKAR

**HINGOLI**

APM/11733 MRS.RATNMALA V. KARLE

**JALGAON**

APM/11633 MR.RAGHURAJ S. BHAGDIKAR
APM/11738 MRS.ANURADHA V. KHEDAKAR
APM/11625 MRS.KUSUM ASHOK PATIL
APM/11631 MRS.SAVITA P. SAPKALE
APM/11632 MRS.SHAKUNTALA S. SONAWANE
APM/11634 MRS.ARESHABANO I. AHMED
APM/11737 MRS.SMITA S. JAKATDAR
APM/11731 MRS.CHARUSHEELA A. SARAF

APM/11739 MRS.SAVITA R. SHUKLA

**KOLHAPUR**

APM/11694 MRS.SHOBHA B. INGAVALE
APM/11647 MRS.URMILA ARUN SHINDE

**LATUR**

APM/11626 MRS.RUPWATI R. MANE
APM/11628 MRS.PRATIBHA KANT KULKARNI

**MUMBAI**

APM/11573 MRS.HEMLATA V. ARYA
APM/11572 MR.INDER B. BANSWANI
APM/11567 MRS.NEELAM N. CHAVAN
APM/11678 MR.GANESH S. CHAVAN
APM/11566 MRS.SUVARNA S. CHIPLUNKAR
APM/11565 MRS.NEELAM N. CHURI
APM/11706 MR.HENRY E.R. D'SOUZA
APM/11680 MRS.HARSHA B. DAVE
APM/11659 MR.AJIT W. DESAI
APM/11683 MRS.PRIYANKA P. EDEKAR
APM/11762 MRS.VANITA A. GADRE
APM/11653 MRS.MEENA H. GOHIL
APM/11584 MRS.PRAGATI P. HAKIM
APM/11696 MRS.VARSHA V. HATE
APM/11671 MR.SADRIDDIN H. JASSANI
APM/11781 MRS.SNEHA S. KARAMBELKAR
APM/11675 MRS.HEMLATA V. KURLEKAR
APM/11800 MRS.DEEPALI D. MALEKAR
APM/11695 MR.SHAM D. MANCHEKAR
APM/11679 MRS.SNEHA S. MODAK
APM/11664 MR.PRAVIN D. MOGRE
APM/11697 MR.SHIVRAM S. NABAR
APM/11579 MRS.LATA A. NILE
APM/11562 MRS.VIBHAVARI V. PALAV
APM/11582 MRS.SUPRIYA S. PARAB
APM/11667 MRS.SAVITA R. PARATE
APM/11640 MRS.SAROJ NANDU PAWAR
APM/11709 MRS.MRUDULA S.PODUWAL
APM/11586 MR.CHANDRABHAN D. PUNWANI
APM/11574 MR.ANIL A. RAJAPURE
APM/11799 MR.PRAMOD A. RAJAPURKAR
APM/11568 MR. S. RAMNATHAN
APM/11682 MR.DILIP S. REDIJ
APM/11662 MRS.ELIZABETH SAJAN
APM/11658 MR.VIJAY H. SAMANT
APM/11791 MR.DNYESHWAR R. SARANG
APM/11782 MR.NARSINHA R. SARPOTDAR
APM/11801 MRS.SNEHAL RAJARAM SAWANT
APM/11585 MRS.NAYANA V. SETH
APM/11580 MRS.JAYSHREE A. SHAH
APM/11681 MRS.RENU R. SHUKRE
APM/11789 MR.MOHAN Y. SONAWANE
APM/11792 MR.VILAS S. SONPATKI
APM/11569 MR.ARUN V. VAIDYA
APM/11571 MRS.URVASHI J. VAJIFAKER
APM/11583 MRS.SAWTI V. VIJAPURE
APM/11783 MRS.ARVUND H.WADKE
APM/11576 MRS.SARLA K.CHAUDHARI
APM/11578 MR.SHRIRAM YASHWANT JOSHI
APM/11579 MR.Q.P.RATHISH
APM/11577 MR.ASSIS J. SEQUREIRA
APM/11575 MRS.MEDHA A. SONTAKKE
APM/11699 MRS.SUNITA S.SUDKE
APM/11656 MRS.SANGITA A. SURWADE

**NAGPUR**

APM/11684 MRS.AZRA SULTANA AHMED
APM/11722 MRS.JIDHNYASHA J. AMTE
APM/11689 MRS.PUSHPA N. BAVANGADE
APM/11743 MRS.SHOBHA W. BHOYAR
APM/11720 MRS.MONIKA SANJEEV DESHPANDE
APM/11745 MRS,MRUGJA SUBHASH DESHPANDE
APM/11686 MRS.VRISHALI A. DOYE
APM/11744 MRS.SNDHYA T. GAWAHANE
APM/11594 MRS.NILIMA S. GHANEKAR
APM/11595 MRS.MADHURI G. GHATWAI
APM/11592 MRS.MOUSUMI A. GHOSH
APM/11688 MRS.SUDESHNA D. KOCHE
APM/11717 MRS.PRITI N.KOSE
APM/11687 MRS.VEENA SUDHAKAR KULKARNI
APM/11721 MRS.SUSHAMA S. MANOHAR
APM/11593 MRS.SUNITA A. MATHANKAR
APM/11718 MRS.ARCHANA RAJEEV PANDE
APM/11591 MRS.SANGEETA NARENDRA PATIL
APM/11685 MRS.ANJALI R.PIMPALKHARE
APM/11719 MRS.CHANDA A. SHENDE
APM/11742 MRS.MALA A. SINGH
APM/11723 MRS.MADHURI A. GANORKAR

**NANDED**

APM/11726 MRS.JYOTI A.DHEPALE
APM/11627 MRS.SHAMAL M. LOHANDE

**NASHIK**

APM/11704 MRS.ANAND G. ATHAVALE
APM/11786 MR.SHAM V. BAKARE
APM/11785 MRS.MANDA ANNA GAIKWAD
APM/11702 MRS.NALINI DHANANJAY JAGTAP
APM/11784 MRS.SNEHA AJAY KULKARNI
APM/11790 MR.ASHOK T. SHIRUDE
APM/11703 MRS.VIJAYA S. SONAJE
APM/11677 MRS.JYOTSNA S. SONAR
APM/11676 MRS.REKHA B. THAKUR

**PALGHAR**

APM/11707 MRS.PRAVINA S. PATEL
APM/11674 MRS.SNEHAL P. BANSODE
APM/11563 MRS.SUPRIYA S. BERDE
APM/11564 MR.KIRAN B. CHURI
APM/11669 MRS.AMITA A. KHANOLKAR
APM/11590 MRS.CHHAYA K. MHATRE
APM/11708 MR.SHAILESH G.OZA
APM/11668 MRS.DEEPTI P. MOHITE

**PARBHANI**

APM/11734 MRS.SANGEETA KALIDAS DESHMIKH
APM/11732 MRS.MEERA PRASHANT DESHPANDE
APM/11735 MRS.SHIVKANYA M. DESHPANDE
APM/11730 MRS.MATHURA R. AMBHORE

**PUNE**

APM/11542 MR.BALWANT S.BARVE
APM/11549 MRS.SUSHEELA P. CHARHATE
APM/11763 MRS.ANUJA D. DAGADE
APM/11776 MR.ATUL SADASHIV DESHPANDE
APM/11559 MRS.UJWALA DHARMA
APM/11546 MRS.SHEETAL S. DURAPHE
APM/11642 MR.VINAYAK D. GATANE
APM/11545 MRS.HEMLATA RAJENDRA JADHAV
APM/11637 MRS.RAJASHREE BHAU JADHAV
APM/11558 MRS.SWATI S. JAIN
APM/11561 MRS.SHOBHA P. KALE
APM/11701 MRS.MEERA S. KELKAR
APM/11639 MR.SURYAKANT B. KOKATE
APM/11643 MRS.NIRMALA SHREEKANT KULKARNI
APM/11691 MRS,SANJIWANI MAHADIK
APM/11654 MRS.NEELIMA M. MHASKAR
APM/11548 MRS.VAISHALI M.PATANGE
APM/11554 MRS.ANJALI S. PATHADE
APM/11544 MRS.VINAYA G. SWARGAONKAR
APM/11777 MRS.SANGEETA ANIL SHINDE
APM/11692 MR.ANUL D. THIGLE
APM/11543 MR.VILAS T.THORAT
APM/11551 MRS.SUREKHA P. BHAGWAT
APM/11641 MRS.JAYSHREE A. GAVALI
APM/11693 MRS.SINDHU R. GHODEKAR
APM/11552 MRS.VIJAYA H.MADANE
APM/11550 MRS.ANAGHA S. PARADKAR

**RAIGAD DIST.**

APM/11670 MRS.VANDANA V, KUMTHEKAR
APM/11711 MRS.BHARTI T.RANE
APM/11725 MRS.MEENAL M. VASMATKAR

**SANGLI**

APM/11771 MRS.ANAGHA A. SIDHAYE
APM/11772 MRS.SHALAN V. ASWALE
APM/11773 MRS.SHANTA V. DEVKULE

**SATARA**

APM/11760 MRS.SUBHADRA R. BHOSALE
APM/11556 MRS.NEHA SATISH KULKARNI
APM/11555 MRS.SHOBHA A. MANE
APM/11768 MRS.VAIBHAVI J. DHARMADHIKARI
APM/11764 MRS.RANJANA T. GHORPADE
APM/11766 MRS.MANISHA M. NATU
APM/11767 MRS.NADINI BHIMRAO PATIL
APM/11765 MRS.RASIKA R. SHEMBEKAR

**SINDHUDURG DIST.**

APM/11715 MR.PRAKASH S.POKHARE

**SOLAPUR**

APM/11645 MRS.ASHA A. DARA
APM/11774 MRS.ANURADHA S. KHISTE
APM/11547 MRS.SHUBHAMGI SHIVRAJ KULKARNI
APM/11557 MR.JAGANNATH D.KULKARNI
APM/11775 MRS. MANDA S. REGE
APM/11757 MRS.JYOTI S. UPLAP
APM/11646 MR,MANGESH S. GUJRAL
APM/11690 MRS.SITA MOTIRAM KAMBLE
APM/11761 MRS.VASUNDHARA P. KAMBLE
APM/11758 MRS.AVIDA R. RANDIVE
APM/11759 MRS.RAMA S. RANSHINGARE

**THANE**

APM/11797 MRS.MEDHA S. APTE
APM/11794 MR.VINOD M. DHARAP
APM/11666 MR.SURESH VINAYAK JOSHI
APM/11698 MRS.NANDINI KOTWAL
APM/11663 MRS.SMITA C.PUSALKAR
APM/11588 MR.VINOD KUMAR SHARMA
APM/11788 MR.RAVINDRA SHIVRAM SHINDE
APM/11570 MR.KISHOR G. TAWDE
APM/11787 MR.SHRIPAD G. VAZE
APM/11779 MRS.SUNITI S. LATE
APM/11665 MR.VIJAY V. MARATHE
APM/11795 MR.NARAYAN MURTHY
APM/11710 MRS.NANDA V. SHINDE
APM/11796 MRS.VIMAL G. SURANJE
APM/11700 MRS.SUNITA V. SURVE
APM/11780 MRS.KRISHNA D. THAKKAR
APM/11778 MRS.MAYURI S.GANDHI
APM/11793 MRS.LALITA D. MAHAJAN

**WARDHA**

APM/11746 MRS.SHEELA B. CHANDEL
APM/11748 MRS.MADHURI M. MENDEWAR
APM/11749 MRS.SADHANA M. UMALKAR

**YAVATMAL**

APM/11713 MRS.KALAVATI V. NIKAM
APM/11621 MRS.VASANTI C. PANDE
APM/11622 MRS.KAMAL VINAYAK PANDE

**FAMILY PENSIONER MEMBERS**

**KOLHAPUR**

FPPM/1156 SMT.MADHURI M. SURYAWANSHI

**MUMBAI**

FPPM/1158 SMT.NATHALIA V.RUMAO

**PALGHAR**

FPPM/1155 SMT.PRABHAVATI B. GHADGE

**PUNE**

FPPM/1160 SMT.SUSHAMA D. KANHERE
FPPM/1159 SMT.MANGALA P. KASTURE
FPPM/1157 SMT.VIJAYA C.LUNKAD

**SANGLI**

FPPM/1161 SMT.ALKA TANAJI KUKMBHAR

**SOLAPUR**

FPPM/1162 SMT.KASHIBAI M. CHAVAN

भटकंती

# शिवतीर्थ रायगड

सत्तर ते ऐशीच्या दशकात आम्ही ट्रेकर्स खूप वेळा रायगड व लिंगाणामाची वर जाऊन आलो आहोत. परीसरातील लोकांशी बरीच जवळीक झाली होती. त्यांच्या अडचणी ऐकून मनाला खूप वेदना होत. येथील लोक उन्हाळ्यांमध्ये दही ताक विकून मिळणाऱ्या पैशांवर गुजराण करतात. मुळचे हे मावळे! धाडसी, बेडर, कणखर वृत्तीचे आहेत. कोळशाच्या खाणीतील सापडणाऱ्या हिऱ्यासारखे आहेत. हिऱ्याला पैलू पाडल्यानंतर याची किंमत करणे अवघड असते. असेच निमशहरी किंवा शहरी भागात आणून यांना शिक्षण घ्यायलाच पाहिजे व खेळाची आवड निर्माण केल्यास खेळाडू, सैनिक किंवा पोलीस खात्यात भरती केल्यास उत्तम प्रकारे हे करीअर करू शकतात. सैनिकी पेशात गेल्यास जगातील उत्तम लढाऊ सैनिक बनतील. ही मंडळी ह्या खोऱ्यात माकडासारखे सरसर चढतात व उतरतात. जबरदस्त यांच्या ठिकाणी स्टॅमिना आहे. पण लक्ष कोण देणार?

एकोणीसशेऐंशीच्या महाराजांच्या पुण्यतिथीच्या वेळी त्रिशत संवत्सील व चौऱ्याहत्तरच्या राज्याभिषेकाच्या उत्सवाच्या वेळी तीस पस्तीस लोक स्पेशल गाडी करून रायगडावर गेलो होतो. स्टेट बँकेचा मोठा सिम्बॉल असलेला कापडी फलक आमच्या ट्रेकर्सचा होता कोल्हापूरपासून रायगडाच्या पायथ्यापर्यंत मोठ्या दिमाखात मिरवत आला होता. गडावर खूप गर्दी होती. भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी मिरवणुकीच्या पुढे बँकेचा कापडी फलक दिमाखाने फिरत होता. कोल्हापूरच्या प्रसिद्ध दैनिकामध्ये फ्रंट पेजवर बँकेचा सिम्बॉल असलेला फलक छापून आला.

कोल्हापूरचे बन्या बापू हे एक प्रसिद्ध व्यक्तीमत्व होते. ते महाद्वाररोडवरील सेरेकन या हॉटेलचे मालक होते. उत्कृष्ठ मलखांब पटू होते. त्यांनी रायगडला आपल्या सोबत मलखांबचा पोल आणला होता. याचे वजन फार होते. परतीच्या वेळी नेमका मल्लखांब खाली आणावयास बन्याबापूंचा ग्रुप विसरला. कोणीच मल्लखांब खाली आणावयास तयार नव्हता. जो तो टाळाटाळ करू लागला. त्यात एक तास गेला. शेवटी आमच्या बँकेचे सहकारी आर. के. घोरपडे, प्रकाश मालणकर व मी जाऊन दीड ते पावणे दोन तासानंतर खाली घेऊन आलो. सगळ्यांनी टाळ्या वाजवून कौतुक केले.

गडाच्या पायथ्याशी चितदरवाजापाशी आपण येतो तेव्हा एका, पाटीवरचा मजकूर आपले लक्ष वेधून घेतो.

'रायगडावर खडे पसरले!
शिवरायांचे पायी,
तीच आम्हाला माणिक मोती!
दुसरी दौलत नाही।

पाटीवरचे हे भाग्य वाचल्यानंतर 'उर' अभिमानाने भरून येतो. पूर्वी रायगडावर यावयाचे म्हणजे महाडपासून पायीच यावे लागत असे. पर्यटकांचे मोठ्या प्रमाणावर येणेजाणे सुरू झाल्यानंतर रस्ता तयार करण्यात आला. बाहेरगावच्या बऱ्याच गाड्या पायथ्यापर्यंत येतात. महाड एस. टी. स्टँडवरून दीड दोन तासाच्या अंतराने रायगडावर बस सोडण्यात येते. आताच्या रायगड जिल्ह्याला पूर्वी कुलाबा जिल्हा म्हणून ओळखले जात असे. महाडपासून जवळ जवळ बावीस किलोमीटर अंतरावर सह्याद्री पर्वतांच्या एका अतीउंच शिखरावर हा किल्ला वसलेला आहे. समुद्रसपाटीपासून रायगडची उंची २८२९ फूट आहे. पण आता १४२० फूटापर्यंत बस जाऊ शकते. म्हणजे चित दरवाजा पर्यंत जाऊ शकते. येथून मात्र पायऱ्या चढूनच गडावर जावे लागते. जवळ जवळ सव्वा ते दीड तासात साधारण उतार वयाकडे झुकलेला माणूसच जाऊ शकतो. आता गडावर जाण्यासाठी रोपवेची सोय केली आहे. परंतु रोपने जाण्यात काही गमंत नाही. तेव्हा शहाण्या माणसाने गडावर जाऊच नये.

पाचवड येथे जिजामाता राणी साहेबांसाठी महाराजांनी चौसोपी वाडा बांधला आहे. कारण पावसाळ्याचे चार महिने संपूर्ण गड गारठ्याने व धो धो कोसळणाऱ्या पावसाच्या सरीने व्यापलेला असतो. दाट धुक्याने सुद्धा काही दिसत नाही. यामुळे येथील हवामान मॉसाहेबांना मानवत नव्हते. या कारणास्तव पाचाड येथे त्यांची राहण्याची सोय करण्यात आली होती.

आज या वाड्यातील इमारती भग्न अवस्थेत सांगाड्याच्या रुपात उभ्या आहेत. रखवालदाराची चौकी माँसाहेबांचा राहता वाडा, देवघर सर्वांची पडझड झाली आहे. मन विषण्ण होतं. येथे एक रेखीव बांधणीची पायऱ्यांची विहीर आहे व एक दगड तक्क्यासारखा बसविला आहे. या दगडाला टेकून महाराज रयतेच्या अडचणी समजावून घेत. या ठिकाणाला आम्ही सर्वांनी साष्टांग दंडवत घातला. येथून जवळच माँसाहेबांची समाधी आहे. चौकोनी दगडात बांधली आहे. वृक्षारोपण करण्यात आले आहे. छोटीशी पुष्पवाटिका आहे. समाधीजवळ तुळशीवृंदावन आहे. हा परिसर मनाला भारावून टाकणारा आहे.

एक गोष्ट मात्र लक्षात असू देत. महाराजांच्या समाधीचे व सिंहासनाचे दर्शन घेऊन फड्याला पाय लावून धावत परत येणे म्हणजे रायगड दर्शन नव्हे. रायगड व पाचाड परिसर

पाहण्यास तीन दिवत तरी लागतात.

चित्तदरवाजापासून गड चढत असताना पंधरा मिनिटात आपण खूब लढा बुरूज पार करून वालसुऱ्याच्या खिंडीत येतो. डोंगर सोंडेतून या एकाच बाजूने गडावर जाता येते. अन्यथा इतर सर्व बाजूंनी गडावर येण्यास वाट नाही. सर्वत्र आहेत ताशिव उंचच्या उंच उभे कडे. रायगड व डोंगररांगा ज्या ठिकाणी मिळतात ती ही वाळसुऱ्याची खिंड म्हणून या वाटेवर लक्ष ठेवण्यासाठी महाराजांची खूबलढा हा बुरूज बांधून घेतला. या ठिकाणी अनेक लढाया झाल्या आहेत. महाराजांची या जागेवर नेहमी टेहळणी असायची. रायगडावरच्या बहुतेक सर्व लढाया येथेच झाल्या आहेत. आता राहून राहून एका गोष्टीचे नवल वाटते, ते म्हणजे हिरकणीचे, संध्याकाळच्या वेळी गडावरचे खाली जाणारे सर्व दरवाजे बंद झाल्यानंतर ही धाडसी, बेडर वृत्तीची, स्त्री मुरमाड बारकी लाल, निसरडा खर्डीचा उतारीचा मार्ग असताना तसेच खाली ताशिव उभा, उंचच्या उंच आकलन शक्तीच्या पलीकडच्या कडा असताना आपल्या चिमुकल्या बाळाच्या ओढीने कशी खाली गेली, केवढे मोठे दिव्य कार्य या मातेने केले. गडावर खूप गर्दी असल्यामुळे होलीच्या माळावरच आम्हाला झोपेच्या वेळी पथाऱ्या पसराव्या लागल्या होत्या. पहाटे जेव्हा जाग आली तेव्हा समोरच्या आकाशाकडे लक्ष गेले. ते दृश्य पाहून आम्ही थक्क झालो. राजगड व तोरणा या गडांचे बाले किल्ले आभाळा भिडल्याचा आभास होत होता. याच्यामधून होणारा सूर्योदय पाहण्यात सुखद आनंद वाटतो. भगवंत सूर्यनारायणाला मनोभावे नमस्कार घातला. ताजेतवानं झाल्यानंतर जगदीश्वर मंदिराचे व अष्टकोनी समाधीचे दर्शन घेऊन, गडावर फेरफटका मारण्यासाठी पुढे निघालो. प्रथम आम्ही भवानी टोकाकडे निघालो. हा मार्ग फारच चिंचोळा आहे. जपून चालावे लागते. खाली मोठी दरी आहे. कड्याच्या टोकात एक छोटीशी गुहा आहे. हेच भवानीचं मंदिर आहे.

परत येताना बाजारपेठयेथून टकमक टोकाकडे जाता येते. वाट धोक्याची आहे. सोसाट्याचा वारा, पाऊस किंवा धुके असेल तर या ठिकाणी जाऊ नये. टकमक टोकावरून खाली पाहीले तर डोळे फिरायला लागतात. पोटऱ्यात गोळे येतात. फार वेळ येथे थांबू नये. गुन्हेगारांचा येथून कडेलोट करण्यात येत असे.

गडावर पाहण्यासारखे खूप आहे. हिरकणी वरून सुर्यास्त पाहावा तेथून नगारखान्यापाशी यावे. ही सर्वात उंच इमारत आहे. राज्याभिषेकाच्या त्रीशतक सोहळ्याच्या वेळी महाराजांचा सिंहासनाधिष्ठित पुतळा बसवला आहे.

६४/१५ मारूती लक्ष्मण बसरीकट्टी, कोल्हापूर

दूरध्वनी (०२३१) २५३७६७२

## आपल्या 'संवाद' गृहपत्रिकेची एक तपपूर्ती

बोलता बोलता आपल्या या संघटनेला चाळीस - बेचाळीस वर्षे झाली आणि 'संवाद' गृहपत्रिकेला एक तप पूर्ण होऊन गेले आहे.

सुरूवातीचे संपादकीय वाचल्यानंतर अंकातील पुढील मजकूर वाचण्यासाठी उत्साह येतो. संपादक मंडळींचा प्रत्येकाचा ठसा आगळावेगळा आहे. सर्वश्री क्रांतीसेन आठवलेंचे लिखाण स्फुर्ती आणणारे, तर वसंतराव धुपकरांचे मधुर स्वरांचे, प्रभाकर गुपचूपांचे प्रेमाचे चिमटे घेणारे आणि शरद शिंगवेकरांचे ब्रह्म ज्ञानात रममाण करणारे असते. पुढे कथा-काव्य-विनोदी चित्रे-प्रवास वर्णने-सर्व सभासदांना समाधान देणारे असते हे केवढे टॉनिक आहे! प्रत्येक महिन्यात 'संवाद' केव्हा मिळतो याची सभासद किती आतुरतेने वाट बघत असतात हे निराळे सांगावयास नकोच. 'संवाद' आला नाही तर सभासद दहावेळेस ऑफिसला फोन करतात. आपण हा अंक जतन करून ठेवतो का? ठेवल्यावर तो वेळेवर सापडतो का? मजकूराचा संदर्भ पाहता का? व्यक्ति विशेष वाचल्यावर किंवा युनिट वृत्त वाचून काही स्फूर्ती येते का? सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्री. दांडेकरसाहेबांचे अभ्यासपूर्ण, माहितीपूर्ण, मार्गदर्शन पर लेख- त्याचे स्पष्टीकरण पुढील काळजी हक्काच्या गोष्टी त्यासाठी केलेला पत्रव्यवहार त्याचा क्रमांक-दिनांक, आलेले उत्तर आणि स्पष्टीकरण आणखी काय पाहिजे आपल्याला?

प्रत्येक गोष्टीसाठी मजकुर मिळवावा लागतो. मग त्याची जुळवा जुळव, आखणी, जोडणी मुद्देसुदपणा काळ-काम-वेग आणि अंक वेळेवर पोष्टात टाकणे यासाठी संपादक मंडळींची धावपळ आणि सर्वश्री लळिंगकर, श्री. गंधे व अविनाश देशपांडे यांची तळमळ व तत्परता व असंख्य पडद्यामागच्या कलाकरांची धावपळ परत टपाल वाटप करणारा पोष्टमन किती टक्के टोणपे वाद नको संवाद असावा सभासदाला संवाद मिळावा. श्री. पी. के. देवधरांच्या पुढील ओळींची आठवण येते -

मनी करा एकच निश्चय।
संघटनेला वाढविण्याचा।।
सहकार्याते सामर्थ्याने।
जगन्नथाचा रथ ओढण्याचा।।
आपले कार्य बाकी आहे
अजून बरेच करावयाचे आहे।
जिद्दीचे आणि जिकीरेचे
जगन्नथाचे रथ ओढण्याचे।।

मग सभासद मित्रांनो, द्याल ना प्रतिसाद?

७६/१५ मधुकर पालकर, पुणे

दूरध्वनी ०२०-२४४७१७६६

# ह्या अशा अंधश्रद्धा

श्रद्धा या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द म्हणजे अंधश्रद्धा आहे का? मुळात श्रद्धा आणि अंधश्रद्धा दोन्हीचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. श्रद्धा म्हणजे दृढ विश्वास. माणसाचा कशावरतरी किंवा कुणावरतरी अढळ विश्वास बसतो की ज्या विश्वासामुळे त्याला आत्मिक बळ मिळते, त्याचा आत्मविश्वास वाढतो, ती श्रद्धा. कुणाची श्रद्धा आपल्या आईवडिलांवर असते तर कुणाची शिक्षकांवर. मात्र बहुजनांची श्रद्धा देव वा ईश्वर या मानवनिर्मित संकल्पनेवर असते. कुणाची श्रद्धा कुठे असावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न. या श्रद्धेमधून अंधश्रद्धा अंकुरते? आपल्याकडे जे जे चांगले आहे, उत्तम आहे, ते ते आपल्या लाडक्या दैवताला अर्पण करावे ही मुलभूत कल्पना. उदा.देवाच्या दगडी प्रतिमेवर दुधा, तूपाचा अभिषेक करणे. हा उपासनेचा एक मार्ग. पण यातून कर्मकांड सुरू झाली. मग पूजा, अर्चनेतून श्रद्धा लुप्त झाली व अंधश्रद्धेचा शिरकाव झाला. एखाद्या परिस्थितीमध्ये काही अनिष्टसुचक किंवा दुश्चिन्हे आढळली तर त्यावर मात करण्यासाठी माणूस इतर कशावर तरी विश्वास ठेवतो. त्यामागे कुठलेहि शास्त्रीय कारण नसते, वैज्ञानिक आधार नसतो. विज्ञान म्हणजे काय? डोळ्यांना दिसणाऱ्या भौतिक जगाचा, त्यातील इंद्रियगोचर पुराव्यांवर, प्रकटीपणावर आधारलेला व त्याचा विशिष्ट प्रणालीनुसार (Methodical) केलेला अभ्यास म्हणजे विज्ञान. विज्ञानामध्ये प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीमागे असणारा कार्यकारण भाव सांगता आला पाहिजे. प्रत्येक गोष्टीला कारण असतेच किंवा ती गोष्ट कशाचातरी परिणाम असते. विज्ञानामुळे माणसाचे आयुष्य आणि जीवनशैली बदलून गेली हे मात्र निश्चित.

संकटाच्या भीतीने मन ग्रासलेले असेल तेव्हा माणसाची तर्कबुद्धि गहाण पडते. हतबल माणूस सारासार विचार करण्याची शक्ति गमावून बसतो. तर्कहीन विचारातून केलेल्या कृतिनंतर एखादी अपेक्षित घटना घडली तर तो विश्वास गैर असलातरी दृढ होतो व अंधश्रद्धेचा जन्म होतो. अंधश्रद्धा दुर्बल, अशक्त मनाचे समर्थन करतात तर अभय, विचारी मनावर अकारण आघात करतात. तर्काधिष्ठित विचारसरणीच्या अभावामुळे व अज्ञानामुळे अंधश्रद्धा उगम पावतात. तर्कहीन, बुद्धिहीन विचार व एकूण अज्ञान यामुळे समाजात अंधश्रद्धा पसरतात. अंधश्रद्धा फक्त अज्ञानी, अडाणी लोकांमध्येच असते असे नाही. सुशिक्षितांमध्येही असते.

अंधश्रद्धेचे ढोबळ मानाने दोन प्रकार असतात. सुदैव आणणाऱ्या व दुर्दैव आणणाऱ्या. २०११च्या जनगणनेनुसार भरतात ७४% लोक साक्षर आहेत. तरी अंधश्रद्धेचा प्रभाव कमी झाला नाही. दोन्ही प्रकारच्या अंधश्रद्धा समाजहीताला घातकच. त्यासाठी डॉ.दाभोलकरांसारखे धुरीण अंधश्रद्धा निर्मुलनाचे काम सातत्याने करतात. सर्व प्रकारच्या समाजामध्ये कमी अधिक प्रमाणात अंधश्रद्धा आहेच. जात/धर्म/देश असे भेद नाहीत. त्यांचे समूळ उच्चाटन व्हायला हवे हे नि:संशय. ते कसे करायचे? अंधश्रद्धेचे मुळ कारण गरिबी, बेरोजगारी, अपूरा व निकस आहार हे आहे. हे सर्व नष्ट व्हायला हवे. सुधारणांविषयी पूर्वीपासून असलेले कलुषित समाजमन हाच प्रगतीच्या मार्गातला मोठा अडथळा आहे. लहानवयापासून मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे. वैज्ञानिकदृष्ट्या विचार करण्याची त्यांची मन:स्थिती तयार झाली पाहिजे. जुने बुरसटलेले विचार नष्ट होऊन नवे तर्काधिष्ठित विचार रूजले पाहिजेत. नव्या परिस्थितीशी जुळवून घेणारा, चैतन्याने रसरसलेला तरूण वर्ग निर्माण करावा लागेल.

फार प्राचीनकाळी आपल्याकडेच विज्ञान प्रगत होते. श्रीविष्णूच्या वराहावतरापूर्वीपासूनच पृथ्वी गोल असून गतिमान आहे हे भारतियांना ज्ञात होते. दशमानपद्धति व शून्य या भारताच्या जगाला मोठ्या देणग्या आहेत. तेव्हा विज्ञानाचा पाया आध्यात्मिक होता. आता आपण प्राचीन शैक्षणिक पद्धतीचा तसेच कौटिल्य, आर्यभट्ट यांनी दाखवलेल्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. भारतात दुर्दैवाने शास्त्रीय प्रणाली किंवा वैज्ञानिक चिंतनाला चालना देणारे कार्यक्रम प्रसारमाध्यमे दाखवत नाहीत. शास्त्रीय संशोधनाला चालना मिळून शिक्षणाची आस तरूणांमध्ये निर्माण व्हायला हवी. तशा मासिकांचा/पाक्षिकांचा विद्यार्थ्यांवर मारा व्हायला हवा. स्वामी विवेकानंदांनी अंधश्रद्धांचा कडाडून निषेध केला असून सध्याच्या तत्त्वांमध्ये आमुलाग्र क्रांती व्हायला हवी असे त्यांना वाटे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ति अनुकूल, सक्रिय हवी. नुसताच कायदा करून उपयोग नाही तर समाजाचे मतपरिवर्तन होणे आवश्यक आहे.

८१/१५

अरूण तुळजापूरकर, पुणे
मो. ९८९०२२६१५४

## व्यक्तिविशेष - श्री.अशोक काशीकर

क्रिडा प्रतिष्ठान व यशश्री अभ्यासिका यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी गुणगौरव व पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला. लायन्स क्लब ऑफ पुणे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर अध्यक्षस्थानी होते. त्यांचे हस्ते Chartered Accountant, Company Secretary तसेच एम.पी.एस.सी. परिक्षेमध्ये जे विद्यार्थी यशस्वी झाले त्यांचा ट्राफी व पारितोषक देऊन गौरव करण्यात येत होता. त्या नंतर यशस्वी विद्यार्थ्यांचे मनोगत सुरू झाले. प्रत्येक विद्यार्थी, मी अभ्यास कसा केला व त्यामध्ये श्री.काशिकर सरांची मदत कशी झाली, हे सविस्तरपणे सांगत होता. काही मुलांनी सांगितले की, आम्ही श्री.काशिकर काकांच्यामुळे स्पर्धा परीक्षा पास होऊ शकलो. प्रत्येक सत्कारार्थी श्री.काशिकरांचे कौतुक करीत होता. त्यांना धन्यवाद देत होता. अध्यक्षांनी व प्रमुख पाहुण्यांनी श्री.काशिकरांच्या उपक्रमाची प्रशंसा केली व त्यांना धन्यवाद दिले.

श्री काशीकर यांनी बाहेरून येणाऱ्या मुलांना अभ्यासासाठी अभ्यासिका सुरू करून त्यांनी त्यांच्या अभ्यासाची सोय करून दिली आहे. सातारा रोडवरील सिटीप्राईड सिनेमा थिअेटर समोरील हॉलमध्ये ही अभ्यासिका सन २००२ पासून सुरू केली आहे. याचा लाभ सी.ए., आय.सी.डब्लू. ए., सी.एस. या परिक्षांची मुले घेत आहेत. आजपर्यंत या अभ्यासिकेतून ७५ विद्यार्थी सी.ए., ४० विद्यार्थी आय.सी.डब्लू.ए., ४० विद्यार्थी सी.एस. तसेच १० विद्यार्थी यु.पी.एस.सी., २० विद्यार्थी एम.पी.एस.सी. परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. येथे अभ्यास करणारे बहुतेक विद्यार्थी प्रोफेशनल व स्पर्धा परिक्षेची तयारी करणारे होत. अंदाजे ३५० विद्यार्थी दरवर्षी अभ्यासिकेत असतात. ही जागा अपूरी पडू लागली म्हणून बिबवेवाडीला गेल्या १२/१३ वर्षात एकूण १९ शाखेत अभ्यासिकेचा विस्तार झाला आहे. असे हे श्री.काशिकर स्वभावाने शांत आहेत. मितभाषी आहेत. दुसऱ्याला मदत करणे, हा त्यांचा स्थायीभाव आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्यात त्यांना धन्यता वाटते. आनंद मिळतो. एखाद्या मुलाकडे अभ्यासिकेची फी भरण्याची ऐपत नसेल तर ते त्याला काहीही शुल्क न घेता, अभ्यासास बसण्याची परवानगी देतात. श्री. काशीकर दरवर्षी वर्षातून दोन वेळा यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करतात. वेगवेगळ्या क्षेत्रातील विद्वान मंडळींना निमंत्रित करून त्यांचे हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करतात. त्यावेळेस त्यांचा मित्रपरिवार जातीने मदतीला हजर असतो. श्री. काशिकर यांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे. ते दुसऱ्या व्यक्तीबरोबर फार चटकन संवाद साधू शकतात. समान धागा शोधून त्याचे मैत्रीमध्ये रुपांतर केव्हा होते हे कळत नाही. श्री. काशिकरांच्या या सामाजिक कार्यास माझ्या शुभेच्छा! शेवटी असे म्हणावेसे वाटते की, हे कार्य करीत असताना, त्यांची सहजच होते समाज सेवा!

४५/१५ ग. ल. देव, पुणे

मो.९४०३१८६४२२

## गीत रामायण

रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये म्हणजे भारतीय संस्कृतिची मानदंडे असलेली ग्रंथसंपदा. हजारो वर्षांपासून हिंदुस्थानी प्रजेला जीवनाचे कार्गदर्शन करीत आहेत. मूळ संस्कृतात असलेली ही दोन महाकाव्ये भारतातील सर्व बोलल्या जाणाऱ्या भाषेत व जगातील सर्व प्रमुख भाषेत भाषांतरीत झालेली आहेत.

महाराष्ट्रात १ एप्रिल १९५५ ते १९ एप्रिल १९५६ या दोन रामनवमीच्या काळात पुणे आकाशवाणीवर प्रसारीत झालेली ५६ गीते म्हणजे सर्वपरिचीत असलेल्या रामायणाची गीतावृत्ती आहे. ह्या गीत रचनेनंतर ग. दि. माडगुळकरांना 'आधुनिक वाल्मिकी' म्हणून लोकांनी पदवी प्रदान केली. संगीतकार व गायक बाबुजी उर्फ सुधीर फडके ह्यांच्या स्वररचनेमुळे व गायनामुळे हे 'गीत रामायण' मराठी मनात गेले अर्धशतक घर करून राहिले आहे.

विलेपार्ले (मुंबई) येथील सभासद श्री.मुकुंद सराफ यांनी ग.दि.मांच्या या ५६ गीतांचे ५६ लेखांद्वारे उत्तम रसग्रहण केलेले आहे. हे संपूर्ण ५६ लेख मुंबई येथील 'नवशक्ति' दैनिकाने 'ऐसी अक्षरे रसिके' या सदराखाली रविवार पुरवणीत सातत्याने २७ मार्च २०१४ ते ८ एप्रिल २०१५ दरम्यान प्रसिद्ध केले होते. ह्या सर्व लेखांचे वाचकांकडून उत्तम स्वागत केले गेले. त्यातून प्रेरणा घेऊन हे ५६ रसग्रहणात्मक लेखन ग्रंथरूपाने 'गीत रामायण - काव्य नव्हे हा अमृतसंचय' या नावाने नागपूरच्या विजय प्रकाशनने नोव्हेंबर २०१५ मध्ये प्रसिद्ध केले आहे.

ह्या ग्रंथात गीत रामायणातील ५६ गीतांचे पुनर्मुद्रण असून सोबत प्रत्येक गीताचे रसग्रहण, गीत पुणे आकाशवाणीवरून पहिल्यांदा प्रसारित झाल्याचा दिनांक, गीतांचे मुळ गायक, त्यांचे फोटो, गीत कोणत्या राग/रागिणीवर आधारित आहे त्यांची नावे, गीताचा ताल, साथीला असलेल्या वाद्यांची नावे व वादकांची नावे इ. सविस्तर माहिती दिलेली आहे.

ग.दि.मा. व सुधीर फडके यांच्या 'गीत रामायण' ह्या महाकाव्याचा संगीतमय इतिहास श्री.सराफ यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण रितीने सादर केलेला आहे. श्री.सराफ यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांना त्यांच्या भविष्यकाळातील लेखनासाठी शुभेच्छा!

वसंत धुपकर

मो. ८९७५२१८०४९

## पॅरामाऊन्ट हेल्थ सर्व्हिसेसची कार्यतत्परता

आपले मुंबईचे एक पेन्शनर डॉ. बी. आर. कदम आपल्या पत्नीसह पवई येथे काही कामासाठी गेले होते. वाटेत अचानक त्यांच्या छातीत दुखू लागले व त्यानंतर त्यांना खूपच त्रास जाणवू लागला. सुदैवाने ते हिरानंदानी हॉस्पिटलच्या समोरूनच जात होते. नुकतीच त्यांनी जानेवारी २०१६ मध्ये फॅमिली फ्लोटर गृप हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी घेतली होती. पण त्यांना मेडिकल आय. डी. कार्ड आले नव्हते. त्यांची पत्नी सौ. वृषाली कदम यांनी तत्परतेने पॅरामाउंट हेल्थ सर्व्हिसेस प्रा. लि. जे थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून काम पहातात, त्या कंपनीस टोल फ्री नंबरवर फोन लावला. तो फोन बंगलोरचा असल्याने त्यांनी मुंबईचे त्यांचे प्रतिनिधी श्री. शार्दुल जोशी यांना फोन करण्यास सांगितले. श्री.शार्दुल जोशी यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितल्यावर त्यांनी प्रसंगाचे गांभिर्य ओळखले व पेन्शनरचे पूर्ण नाव, अर्ज केव्हा केला त्याची तारीख व प्रॉव्हिडंट फंड इन्डेक्स नंबर विचारले. सौ. कदम यांनी ही माहिती दिल्यावर त्यांनी ताबडतोब हिरानंदानी हॉस्पिटलला फोन करून डॉ. कदम यांना वैद्यकिय मदत देण्यास सांगितले. तसेच त्यांना पूर्णपणे कॅशलेस फॅसिलिटीची पण मदत देण्यास सांगितली. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी डॉ. कदम यांच्यावर त्वरित उपचार सुरू केले व त्यांची ॲन्जिओग्राफी व नंतर ॲन्जिओप्लास्टी करावी लागली. एक आठवड्यानंतर डॉ. कदम यांना पूर्णपणे तंदुरूस्त झाल्यावर घरी पाठविण्यात आले. हॉस्पिटलचा एकूण खर्च रु. ४.५७ लाख इतका आला. त्यापैकी इन्शुरन्स कंपनीने रु. ४.५० लाख हॉस्पिटलला देऊ केले. पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हिसेस (टि.पी.ए.) या कंपनीचे प्रतिनिधी श्री. शार्दूल जोशी यांनी अत्यंत तत्परतेने मनापासून व कर्तव्यभावनेने मदत केल्यानेच डॉ.कदम यांच्यावर वेळीच उपचार होऊ शकले. श्री. शार्दुल जोशी यांनी दाखवलेल्या कर्तव्य तत्परतेबद्दल त्यांचे व पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हिसेसचे शतश: आभार. सर्व पेन्शनर्सना विनंती करण्यात येते की सौ.वृषाली कदम यांनी दाखविलेले प्रसंगावधान सर्वांनी दाखववावे. थोडक्यात म्हणजे सर्व महत्त्वाची माहिती जवळ ठेवणे. वेळ कोणावरही सांगून येत नाही. श्री. शार्दुल जोशी यांचा मो.नं.०७०४५४१७५८३.

श्री.जयंत पुसाळकर,
मुंबई झोनल सबसेंटर

## वात्सल्यातून मातृत्वाकडे

आयुष्यात जो प्रेम देतो त्याला ते अधिक प्राप्त होते. देण्याचा प्रकार वात्सल्य-प्रेम-मदत-संपत्ती-मैत्री-कोणताहि असो देणाऱ्याला अखेर प्राप्त होणारे समाधान अमूल्य असते.

आपले एक पेन्शनर व स्टेट बँक दहिसर पेन्शनर्स वेल्फेअर ऑर्गनायझेशनचे कार्यकर्ते श्री.मंगेश कडले ह्यांच्या स्नुषा सौ.वीणा भाग्येश कडले या लोकमान्य टिळक हॉस्पिटल, सायन मुंबई येथे परिचारिका म्हणून कार्यरत आहेत. दोन वर्षा पूर्वी शिळफाटा-मुंब्रा येथे झालेल्या इमारत दुर्घटनेत मरण पावलेल्या दांपत्त्याची मुलगी कु.संध्या (वय ६ वर्षे) जखमी अवस्थेत हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आली होती. परिचारिका ह्या नात्याने सौ.वीणा कडले ह्यांनी दिवस-रात्र प्रेमाने सेवा करून कु.संध्याच्या शारीरिक जखमा तर बऱ्या केल्या तसेच अपघातामुळे कु.संध्याच्या बालमनावर झालेल्या मानसिक धक्क्यातून तिला बाहेर काढले. अपघातानंतर हॉस्पिटलमध्ये आणलेल्या त्या अनाथ मुलीवर गुदरलेले संकट पाहून सौ.वीणा ह्यांचे हृदय द्रवले व त्याचवेळेस कु.संध्यास दत्तक घेण्याचे त्यांनी मनाशी निश्चित केले. त्यांच्या इच्छेस घरातील सर्व सदस्यांनी विलंब न लावता होकार दिला.

दत्तक विधानासाठी आवश्यक असणाऱ्या अटींची पूर्तता केल्यानंतर कु.संध्याचे दत्तक विधान नुकतेच पूर्ण झाले. कडले कुटुंबातील या नव्या वारसाचे नामकरण कु.राधा असे करण्यात आले आहे.

श्री.मंगेश कडले राहत असलेल्या आशिर्वाद सोसायटीचे सर्व सभासद व कुटुंबीय ह्या कार्यक्रमास हजर होते. सौ.वीणा कडले ह्यांनी दाखवलेल्या वात्सल्यातून त्यांना प्राप्त झालेल्या मातृत्वाचा आनंद कडले कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

ग.दि.माडगूळकर व सुधीर फडके ह्यांनी अजरामर केलेल्या गीतरामायणाच्या हिरक महोत्सव समारंभात सौ.वीणा ह्यांना श्रीधर फडके ह्यांच्या हस्ते ''करूणामय अंत:करण'' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

श्री.मंगेश कडले हे संस्थेचे क्रियाशील कार्यकर्ते असून अनेक सामाजिक संस्थेत त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. कडले कुटुंबाचे अभिनंदन!

सेक्रेटरी

## तडजोड एक पाक(पवित्र) कृती...

स्वत:ला तोडूनच जोडायचं
जोडायचं अन तडीला न्यायचं
भावनांना आवरायचं
विचारांना लगाम घालायचा
मनाला बासनात गुंडाळून
सरळ खुंटीला टांगायचं
दु:ख थोडं थोडं झिरपत जाईल
अन टणक गोळा तयार होईल!
नंतर इतरांचे सल्ले, सूचना,
अनुभवांचे बोल असं सगळंच
एकत्र करायचं
भावनांचे आवरलेले कढ,
दबलेल्या हुंदकऱ्यांचा रस घालून
सगळ्यांच्या सूचना सल्ल्यांची
खमंग फोडणी द्यायची
तयार होईल...
सगळ्यांना बांधून ठेवणारी
खमंग पाककृती तडतोड

**९८/१५ सौ. सुषमा तिळवे, फोंडा-गोवा**
**मो. ९८२३०५५७५१**

## अंधकारमय आयुष्य

ती संध्याकाळ उदास वाटत होती मला.
नि मावळतीचा सूर्य, उगाचच रेंगाळत होता क्षितीजावर
त्या वेळी तुझी शेवटची भेट झाली होती नदीकाठी
निरोप घेऊन तू निघालास तेव्हा ओलेत्या अश्रूंची
अबोल भेट मी तुला दिली होती
तुझ्या शिवाय आता माझे आयुष्य
काटेरी ओझे वाटते मला
कधीतरी संध्याकाळी मी
अंगणात बसलेली असते
त्या पसरलेल्या काळ्या यावल्या
जीवाला माझ्या घोर लावतात
मग मिट्ट काळोखाच्या घट्ट मिठीत
मारी सृष्टी झोपी जाते
माझ्या हृदयाच्या देव्हाऱ्यात मात्र
तुझ्या प्रेमाची ज्योत शांत तेवत असते
तिच्या मंद प्रकाशाच्या साथीने
अंधकारमय, माझे आयुष्य
मी फक्त, तुझ्यासाठीच, जगत असते.

**११६/१४ दिलीप रेडकर, गोरेगाव(प)**

## वेगे वेगे धावू...

जीवनाच्या या गतीला स्पीडब्रेकर कसे लावायचे?
मनातून वाटते थांबावेसे तरी एकसारखे पळत राहायचे।
'वेळ नाही काय करू?' हे तर झालय नेहमीचे
मोजक्या मिनीटा-सेकंदांनी कसे, कुठे पुरे पडायचे?
आदर्श संस्कृती, सुंदर इतिहास, निसर्गही देखणा आहे
या साऱ्यांमधे रमायला मला वेळ तरी कुठे आहे?
मोठं चटईक्षेत्र, सुखसोयींनी सुसज्ज घर आहे
घराचं घरपण उपभोगायला मला, वेळ तरी कुठे आहे?
बालांचं संगोपन करायचंय, वृद्धांना प्रेम द्यायचंय
कुणाला कुठे वेळ आहे? नोकरांवरच सोपवावं लागतंय
स्वत:साठीच वेळ नाही समाजाचं देणं कधी द्यायचं?
Time Management चं अवघड गणित, कसा, कधी सोडवायचं?
आहार विहाराचं सूत्र धाब्यावरच राह्यलंय।
पाश्ता, पिझ्झा, बर्गर बरोबर वडापाववर भागतंय।।
कड्या-कुलूपातील बंदिस्त वैभव-लक्ष्मी स्वत:वरच रुसते।
गृहलक्ष्मी घरात यावी म्हणून प्रार्थना, शुभंकरोति म्हणते।
घराचा कण न् कण आसुसलाय, घरातल्या माणसांसाठी
थकलेले जीव week-end च्या थोधात, विश्रांती मिळण्यासाठी।।
पोटाची खळगी भरायला कुणी धावतंय, कुणी मोठ्ठं पोट म्हणून धावतो।
वेगाच्या या शर्यतीमध्ये, नकळत स्वत:लाच हरवून बसतो
आता थोडं थांबावं असं कधी कधी वाटत राहातं।
पण थांबून कसे चालेल? मग मन खंतावतं।।
काळ त्याच्या लयीनेच सरतोय. आपण मात्र धावत सुटलोय
कळतय पण वळत नाही, काय, किती गमवून बसलोय।

सौ. अनघा विद्वांस, डोंबिवली
८७/१५ मो. ९८१९१७२८७४

## दीपांचा उत्सव

दिपांचा उत्सव सरला, सरली ती सारी लगबग
निस्तेज जाहली शहरे, दिपांची विझता झगमग ।।१।।
गृहीणींना मिळे उसंत, कामाचा व्याप न आता
केलेल्या पक्वान्नांना, घरी न्याय मिळाला पुरता ।।२।।
छोट्यांच्या मनी निराशा, किती झटकन् सरली दिवाळी
राखले फटाके त्यांनी, उडवाया पुढल्या वेळी ।।३।।
दिपांचा उत्सव सरला, संपली आत्ताच दीपावली
ते दिवस असे मौजेचे, येतील का पुढल्यावेळी? ।।४।।

**९६/१५ मधुकर सुळे, पनवेल**
**मो. ८९७६२३९३८७**

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**

## Form IV (See Rule 8)

### Statement about the ownership and other particulars concerning S B I Pen. Assn.'s "SAMVAD"

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune. |
| 2. | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3. | Printer's Name | : | Shri. Chandrashekhar Digambar Joshi |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Shree J Printers Pvt. Ltd., 1416 Sadashiv Peth, Pune - 411 030 |
| 4. | Publisher's Name | : | Shri.Vilas Vasudeo Gandhe |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | "Anubandh", Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030 |
| 5. | Editor's Name | : | Shri.Krantisen Ramchandra Athawale |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030 |
| 6. | Owner's Name | : | S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle), Pune |
| | Address | : | "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030 |

I, Shri.Vilas Vasudeo Gandhe, Secretary, SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Pune hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

V. V. Gandhe

Date : 25th March 2016 — Signature of the publisher

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 022-25446837

Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.